सं.फौ.ख.क्र.९०/२०२०
सरकार-वि- विवेक+१
नि.क्र.११ पुढे

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष शपथेवर सुरु -**

माझे नाव- साईनाथ विठ्ठलराव जायभाये
वय –४२ वर्षे, व्यवसाय- नोकरी, पो.हवा
राहणार –पो.स्टे. कोरपना, ता.कोरपना, जि.चंद्रपूर.

**विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्त्या श्रीमती टि.बी.नेवारे यांच्यामार्फत सरतपास-**

१. दि.१०.१२.२०१९ रोजी मी पोलीस स्टेशन, कोरपना येथे नाईक पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होतो. सदर दिवशी मी पोलीस स्टेशनला हजर असतांना मुखबीरद्वारे खबर मिळाली की, धानोली रोड येथून दोन इसम त्यांच्या मोटारसायकलने दारू घेवून येत आहे. त्या खबरेवरून मी, पोलीस स्टाफसह स्टेशन डायरी साना क्र.३८/२०१९ वेळ २१.२३ वाजताच्या सुमारास धानोली रोड येथे पंचासह थांबुन असतांना मुखबीरद्वारे सांगितल्याप्रमाणे मोटारसायकल येत असल्याने त्यांना बॅटरीच्या उजेड दाखवून थांबण्याचा इशारा केला असता ते जवळ न थांबता बाजुला मोटारसायकल थांबवून पळून गेले, त्यांचा पाठलाग केला असता ते मिळून आले नाही. करिता त्यांनी सोडून गेलेल्या मोटारसायकलची पाहणी केली असता मोटार सायकलजवळ एक बॅग मिळून आली. सदर बॅगची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यातून प्रत्येकी १८० एम एलचे देशी दारूचे २५ नग मिळून आले. त्यानंतर सदर दारू पंचासमक्ष जप्त करून त्यातील एक नग सिए नमुण्याकरीता काढण्यात आला, त्यावर सिल लावून पंचांची सही घेतली व मी सही केली तसेच पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. आता मला सुचनापत्र व घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझ्या सहया असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो **नि.क्र.१३ व १४** वर आहे.

२. आता मला सिए फॉर्म दाखविण्यात आला, त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे तो **नि.क्र.१६** वर आहे. त्यानंतर जप्त केलेला मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये आणला. त्यानंतर कायमी रिपोर्ट दिली. आता मला कायमी रिपोर्ट व छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला, त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझ्या सहया आहेत, त्यास **नि.क्र.१७ व १८** देण्यात येत आहे. तपासादरम्यान आरोपींना पोलीस स्टेशनमध्ये आणले होते तेव्हा मी त्यांना बघीतले होते. आरोपींना बघीतल्यास मी ओळखू शकतो.

**सरतपासपूर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एम. एस. धामोरीकर वकील साहेब यांच्यामार्फत सुरू**

३. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनमधून रवानगी करतांना रवानगीची नोंद रवानगी रजिस्टरमध्ये घ्यावी लागते. मी सदर दिवशी रवानगीची नोंद रवानगी

रजिस्टरमध्ये घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, नमूद केलेल्या घटनास्थळी आजुबाजुला जंगल आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटना ही रात्री घडली त्यामुळे मी आरोपींना बघीतले नव्हते.

प्रश्न तुम्ही सिए फॉर्ममध्ये जप्त केलेला दारूचा बॅच नंबर नमुद केला होता काय ?

उत्तर नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, सिए फॉर्मची एक प्रत नमुण्यासोबत प्रयोगशाळेत पाठविले जाते. हे म्हणणे खरे नाही की,घटनास्थळ जप्ती पंचनामा मी पोलीस स्टेशनमध्ये तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरूध्द वरिष्ठांच्या सांगण्यावरून खोटी रिपोर्ट दिली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासपूर्ण**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-

**(दिक्षा दिलीप सहारे)**

दि.०१/०६/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

(२ रे कोर्ट),कोरपना.